# मानसोपचारतज्ज्ञ आणि मी

श्रीमद् नामचैतन्य भानुदास

दि. १२–०५–२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट. साधना आणि मनावरच्या माझ्या संशोधनाला एकवीस वर्षं पूर्ण झाली होती. मनाशी संलग्न असलेल्या इतर सर्व शाखांचा दृष्टिकोन समजणंही आवश्यक वाटत होतं आणि म्हणूनच मी प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञांची अपॉइंटमेंट घेतली. बाहेरच्या कार्यक्रमांमुळे मिळणारी प्रसिद्धी आणि पैसा याचा मोह टाळावा आणि मनावरचं संशोधन करण्यासाठी वेळ मिळावा म्हणून मी दोन वर्षांपूर्वीच 'क्षेत्र–सन्यास' घेतला होता. मानसोपचारतज्ज्ञांनी मला पहिला प्रश्न विचारला ''काय प्रॉब्लेम आहे?'' मी सांगितलं ''मी ठरावीक एरियाच्या बाहेर जात नाही.'' त्यांचा पुढचा प्रश्न ''एखाद्या दुर्घटनेमुळे तुम्हाला शॉक बसला आहे का?'' मी सांगितलं ''आठवत नाही.'' त्यांनी विचारलं, ''एखाद्या विषयाचा गांभिर्याने विचार केल्यामुळे तुमच्या मनावर दडपण येतं का?'' मी सांगितलं ''मी व्यावहारिक विचार फार कमी करतो.'' '' मग ठरावीक एरियाच्या बाहेर जायची भीती वाटते का?'' त्यांनी मूळ प्रश्नालाच हात घातला. क्षेत्र–सन्यासाची बंधनं त्यांनाकशी सांगणार? म्हणून मी म्हंटलं ''अनईझी वाटतं.'' मी मनोरुग्णाच्या कोणत्या ना कोणत्या प्रकारात बसल्याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर  झळकलं. ''शांत झोप लागते का?'' मी सांगितलं ''पाठ टेकताक्षणी.'' ''तुम्हाला कशाची आवड आहे?'' ''सुरांच्या भावात रमणं आणि निर्विचार मनाचा आनंद घेणं.'' या उत्तरामुळे त्यांच्या देहऱ्यावर एक गूढ प्रश्नचिन्ह दिसलं. त्यांनी विचारलं ''मन निर्विचार करता येतं?'' मी म्हटलं ''हो, क्षणार्धात.'' या नंतर त्यांनी माझ्या काही आय.क्यू. टेस्टस् घेतल्या आणि नंतर एक गोळी लिहून दिली. ती सकाळ संध्याकाळ घ्यायला सांगून परत पंधरा दिवसांनी बोलावलं. पण का कुणास ठाऊक, मी निघताना त्यांनी माझा पत्ता आणि फोन नंबर लिहून घेतला. दुसऱ्या दिवशी ज्या गृहस्थांकडून मी मानसोपचारतज्ज्ञांचा फोन नंबर घेतला होता ते त्यांच्याकडे पोहोचले. मनावरच्या माझ्या संशोधनाबद्दल त्यांनी मानसोपचारतज्ज्ञांना बरंच काही सांगितलेलं होतं. मला सर्वजण भाऊ म्हणतात. ''भाऊ आले होते का?'' त्या गृहस्थांनी विचारलं. माझ्या पत्त्याचा कागद त्यांनी या गृहस्थांसमोर ठेवला. '' हो हेच ते.'' ते म्हणाले.  मानसोपचारतज्ज्ञ उद्गारल्या ''सिंप्ली ग्रेट.'' उत्सुकतेपोटी दुसऱ्याच दिवशी त्या माझ्याकडे आल्या आणि बहिर्मनाची निर्मिती, मनाचे तीन स्तर, मृत्युनंतरचं जीवन आणि पुनर्जन्म या संदर्भात मी केलेलं संशोधन त्यांनी समजावून घेतलं. भारावलेल्या अवस्थेतच त्या घरातून बाहेर पडल्या.